ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक :–०४.०४.२०२३

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक लक्ष्मीकांत उत्तमराव बिजलगावे, वय ३३ वर्ष, व्यवसाय नौकरी, वरीष्ठ तंत्रज्ञ, वर्ग–३,एम.एस.ई.डी. सी.एल. कुरूंदा,ता. वसमत,जि.हिंगोली रा. ह.मु. माधव घोरपडे यांचे घरी, बसवेश्वर नगर, वसमत. मुळ गांव मु.पो. अंबुलगा,ता.कंधार,जि.नांदेड यांनी ६,०००/–रू. लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४०००/–रू. लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवून दिनांक ०३.०४.२०२४ रोजी केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान ४,०००/– रू लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे कुरूंदा, ता.वसमत, जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल झाला आहे.**

---

दिनांक ०३.०४.२०२४ रोजी यातील तक्रार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांचे वडीलांचे नावे असलेल्या शेतामध्ये प्रधान मंत्री सोलार कृषी पंप या योजनेतुन सौर पंप बसविण्यासाठी ऑनलाईन कोटेशन व सर्व्हे करून देण्याचे कामात सहकार्य करण्यासाठी आरोपी लोकसेवक लक्ष्मीकांत उत्तमराव बिजलगावे, वय ३३ वर्ष, व्यवसाय नौकरी, वरीष्ठ तंत्रज्ञ, वर्ग–३, एम.एस.ई.डी.सी.एल.कुरूंदा,ता. वसमत,जि.हिंगोली यांनी ६,०००/– रू लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर तक्रादार यांचे तक्रारीची दि.०३.०४.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता लक्ष्मीकांत उत्तमराव बिजलगावे, वरीष्ठ तंत्रज्ञ यांनी पंचासमक्ष ६,०००/– रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४,०००/– रू. लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ०३.०४.२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लक्ष्मीकांत उत्तमराव बिजलगावे, वरीष्ठ तंत्रज्ञ यांनी ४०००/– रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून लक्ष्मीकांत उत्तमराव बिजलगावे, वय ३३ वर्ष, व्यवसाय नौकरी, वरीष्ठ तंत्रज्ञ, वर्ग–३, एम.एस.ई.डी. सी.एल.कुरूंदा,ता. वसमत,जि.हिंगोली रा. ह.मु. माधव घोरपडे यांचे घरी, बसवेश्वर नगर, वसमत. मुळ गांव मु.पो. अंबुलगा, ता.कंधार, जि.नांदेड यांचे विरूध्द पोलीस स्टेशन कुरूंदा येथे गु.र.नं.१८७/२०२४ क.७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली, श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग, पोह श्री राजाराम फुपाटे, चापोह श्री शेख अकबर अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. राजकुमार शिंदे. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४**
**श्री. अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८७०२२१३७९**
**टोल फ्री क.–१०६४, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५**

**अनिल ब. कटके**
**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.**